# जिल्हा परिषद रत्नागिरी
**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन**
**माळनाका, रत्नागिरी - ४१५६१२**
## सामान्य प्रशासन विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दुरध्वनी क्र. ०२३५२ - २२२४२८ ई-मेल :- dyceogad08@gmail.com


जा.क्र. रजिप/साप्रवि/चौकशी /आस्था-९/ ५८८ /२०२३ दिनांक - २९।०५।२०२३

वाचा:- १) महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७.

२) सामान्य प्रशासन विभागाकडील विभागीय चौकशी नियमपुस्तिका चौथी आवृत्ती १९९१ मधील प्रकरण सात नुसार

३) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.सीडीआर-१०९३/१०७७/प्र.क्र.२३/९३/अकरा, दि.१२ ऑक्टों १९९३.

४) या कार्यालयाकडील ज्ञापन क्र. रजिप/साप्रवि/आस्था-९/२१३१/२०२२ दिनांक ०४.०७.२०२२.

५) या कार्यालयाकडील आदेश क्र. रजिप/साप्रवि/आस्था-९/३३७५/२०२२ दिनांक २३.०८.२०२२.

६) या कार्यालयाकडील आदेश क्र. रजिप/साप्रवि/आस्था-९/३३७६/२०२०२ दिनांक २३.०८.२०२२.

७) चौकशी अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांजकडील दि.१५.१२.२०२२ चा चौकशी अहवाल.

८) या कार्यालयाकडील जा.क्र.रजिप/साप्रवि/आस्था-९/४२१/२०२३ दिनांक ०६.०२.२०२३ ची शास्तीपुर्व अंतिम नोटीस.

९) श्री.रविंद्र परुळेकर व.सहा. यांचा दिनांक ०७.०२.२०२३ रोजीचा खुलासा.

१०) या कार्यालयाकडील मंजूर टिपणी दि.

आदेश :-

श्री.रविंद्र नारायण परुळेकर व.सहा.(लि.) आरोग्य विभाग जि.प.रत्नागिरी यांची प्रथम नियुक्ती कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) या मूळ पदावर झाली होती. तथापि कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) सरळसेवा नियुक्ती करीता महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील ९ मधील अनु. क्र. ५ १ (ब) (तीन) मधील तरतुदीनुसार इंग्रजी व मराठी टंकलेखनाची दर मिनिटास ३० शब्द प्रतिमिनिट या गतीने टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण असने आवश्यक आहे.

श्री.परुळेकर व.सहा. यांना पदोन्नतीचे वेळी त्यांचे मुळ प्रमाणपत्र सादर करणेबाबत कळविले असता त्यांनी सदरची प्रमाणपत्र सादर केले नसल्यामुळे त्यांच्या टंकलेखन परिक्षेबाबत साशंक निर्मान झाल्याने त्यांना संदर्भ क्र. ४ अन्वये ज्ञापन व जोडपत्र बजावणेत आले होते. श्री. परुळेकर व.सहा.(लि.) यांचे विरुध्द ठेवणेत आलेल्या दोषारोपाची खातेनिहाय चौकशी करणेसाठी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ (३) नुसार चौकशी अधिकारी म्हणून उप मुख्य कार्यकारी अधिकारी(साप्रवि) यांची नियुक्ती संदर्भ क्र. ५ अन्वये करणेत आलेली आहे.

श्री.रविंद्र नारायण परुळेकर व.सहा.(लि.) यांचेवर ठेवण्यात आलेले दोनही दोषारोप सिध्द होत आहेत, असा निष्कर्ष चौकशी अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांनी संदर्भ क्र. ७ अन्वये सादर केलेला अहवालात नमुद केला आहे.

संदर्भ क्र.३ चे शासन निर्णयानुसार एखादा शासकीय कर्मचारी शासन सेवेतील मूळ नेमणुकीसाठी संबंधित पदाच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीप्रमाणे पात्र नसल्यास संबंधित कर्मचा-याची विभागीय चौकशी करण्यात यावी आणि आरोप सिध्द झाल्यास त्या शासकीय कर्मचा-यास सेवेतून कमी करणेत यावे असे नमुद आहे.

श्री.रविंद्र नारायण परुळेकर व.सहा.(लि.) यांनी कनिष्ठ सहाय्यक (लि.) या मुळ नियुक्तीच्या पदाची अर्हता धारण करीत असले बाबतची प्रमाणपत्र सादर न करता वारंवार दिशाभूल करणारी माहिती सादर करुन कार्यालयाच्या वेळेचा अपव्यय केलेला आहे. खाते निहाय चौकशीअंती त्यांच्यावर ठेवण्यात आलेल आरोप सिध्द झाले आहेत. तथापी श्री.परुळेकर व.सहा. यांनी दि.०७.१२.२०२२ च्या पत्रानुसार त्यांची वयाची ५८ वर्षे सुरु असुन नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणेस अडीच महिन्याचा कालावधी राहीलेला आहे. त्यांची एंन्जीओप्लास्टी व एंन्जीओग्राफी झाल्यामुळे तसेच त्यांच्या वयाचा व त्यांच्या ३१ वर्ष शासकीय सेवेचा विचार करता त्यांचा सहानुभुतीपुर्वक विचार करावा असे निवेदन दिले आहे.सदर निवेदनाचा सहानुभूतीपूर्वक विचार करता त्यांच्यावर सोम्य शिक्षा म्हणून संदर्भ क्र.८ अन्वये त्यांना शास्तीपुर्व अंतिम कारणेदाखवा नोटीस देणेत आलेली होती. सदर नोटीशीच्या अनुषंगाने श्री.परुळेकर व.सहा. यांनी त्यांच्यावर ठेपका ठेवणे ही कारवाई करण्यात येवू नये असे लेखी निवेदन दिले आहे. सदरचा खुलासा या आदेशाव्दारे अमान्य करण्यात येत असुन त्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्या प्रकरणी त्यांचेवर महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४(१) **"ठेपका ठेवणे"** ही शिक्षा या आदेशाव्दारे कायम ठेवण्यात येत आहे.

श्री.परुळेकर व.सहा. हे कनिष्ठ सहाय्यक (लि.) या त्यांच्या नियुक्तीच्या मूळ पदाची अर्हता धारण करीत नसलेने **"ते जिल्हा परिषदेच्या सेवेत असेपर्यंत मराठी व इंग्रजी टंकलेखनाची ३० शब्द प्रतिमिनिट या गतीची टंकलेखन परीक्षा उत्तीर्ण झाले बाबतचे प्रमाणपत्र जो पर्यंत या कार्यालयाकडे सादर करत नाहीत तो पर्यंत ते पदोन्नती व आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळण्यास पात्र ठरणार नाहीत"** असे आदेश निर्गमित करुन श्री.रविंद्र नारायण परुळेकर व.सहा.(लि.) यांची खातेनिहाय चौकशी या आदेशाव्दारे बंद करणेत येत आहे.

सदरचा आदेश हा **श्री.परुळेकर व.सहा.(लि.) यांचे प्रकरणा पुरता पारीत केलेला असून सदर आदेशाचा पूर्वोदाहरण म्हणुन अन्य प्रकरणांमध्ये ग्राहय धरता येणार नाही, याची नोंद घ्यावी.** सदर आदेशाची नोंद श्री.रविंद्र नारायण परुळेकर व.सहा.(लि.) यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदरचा आदेश रत्नागिरी जिल्हा परिषदेच्या https://www.zpratnagiri.org या संकेतस्थळावर उपलब्ध करणेत आली असुन त्यांचा संकेतांक क्रमांक 20230229९१०३७ असा आहे.

**स्थळ प्रतिवर मा.मु.का.अ.**
**यांची स्वाक्षरी आहे.**

**सही/-(किर्ती किरण पुजार,भाप्रसे)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद रत्नागिरी**

**प्रत :- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाही करीता...**

१. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि), जिल्हा परिषद, रत्नागिरी
२. जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद,रत्नागिरी.
३. श्री.रविंद्र नारायण परुळेकर व.सहा.(लि.), आरोग्य विभाग जि.प.रत्नागिरी यांना कार्यालयामार्फत
४. निवडनस्ती आस्था-९ सामान्य प्रशासन विभाग जि.प.रत्नागिरी.

Clerk,
.O.Z.P Ratnagiri

**(परीक्षित यादव)**
**उप मुख्य कार्यकारी अधिकारी(साप्रवि)**
**जिल्हा परिषद रत्नागिरी**